FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154126

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. पहिली खबर क्र. FIR No. ९८, वर्ष Year २०२१, दिनांक Date २३/०३/२०२१

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलमे Sections ८
   (ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day १५/०३/२१ तारीख पासून Date from ........, वेळ Time ........, तारीख पर्यंत Date to २३/०३/२१ वेळ Time ........

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date १५/०३/२०२१, वेळ Time ........

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ४९/२०२१, तारीख Date २३/०३/२०२१ वेळ Time २३:३५

4. माहितीचा प्रकार Type of Information : ........, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name शिवाजीनगर, ठिकाणाचे नंबर No. if any रस्ता नं. ३, गल्ली Ward गोवंडी, रस्त्याचे नाव Name of road मुंबई-४३

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name नुर मुहम्मद खान
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name मुहम्मद खान
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ३६ वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. ........
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........, दिल्याचे ठिकाण Place of Issue ........
   (f) व्यवसाय Occupation व्यापार
   (g) धर्म Religion मुस्लिम, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address : प्लॉट, गल्ली / सर्व्हे नं. Ward २५, घर / नाव नं. House/Name No. ६/०५, फोन / मो. नं. Phone/Mo. No. ........, पॅन नं. PAN No. ........, वोटर्स नं. Card No. ........

   रस्त्याचे नाव Road शिवाजीनगर, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place गोवंडी, गाव Village मुंबई, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. ........

   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........, सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   १) सुनिल बापु मालोदे, वय २८ वर्षे, कनिष्ठ अभियंता
   २) अमर सुरेश तांडे, वय ३४ वर्षे, कामगार. दोन्ही प्रमु. (पू) वॉर्ड बृहन्मुंबई महानगर पालिका, गोवंडी, मुंबई - ४०००४३.

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K).829

Scanned with CamScanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..........

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी लोकसेवक सुनिल मालोदे कनिष्ठ अभियंता, एम पूर्व वार्ड, गोवंडी यांनी फिर्यादी यांच्या मित्राचे खोलीचे बांधकाम परवानगी विना करण्या करीता नमुद बांधकामावर निष्कासनाची कारवाई केल्याचा दिखावा करुन उर्वरित बांधकाम पूर्ण करुन घेण्याकरीता मदत करतो असे सांगुन लाचेच्या रकमेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम रु. ७०,०००/- लोकसेवक अमर तांबे यांच्या मार्फतीने स्विकारल्याने गुन्हा कलम ७ भ्र. प्र. अधिनियम १९८८ अन्वये नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलन नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).......... Rank.......... No..........
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.......... (3) Transferred to P. S. ..........
District.......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name उमेश कोरडे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ..........
Posting
Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with CamScanner

खालील फिर्यादी श्री. नुर मुहम्मद खान, वय ३६ वर्षे, धंदा - पत्रकार, पत्ता - प्लॉट नं. २८, इ/१०५, शिवाजीनगर, गोवंडी, मुंबई यांच्या फिर्यादी जबाब स्वतंत्र कागदावर संगणकीकृत केलेला असून त्याच सदर गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात आला आहे.

समक्ष

(उमेश कोरडे)
पोलिस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई

फिर्याद दिनांक – २३/०३/२०२१.

मी नूर मुहम्मद कबीर अहमद खान, वय ३६ वर्षे, धंदा – पत्रकार, रा.ठी. स्वत:चे घर, प्लॉट नं. २८/ई/५, शिवाजीनगर, रोड नं. ३, हरी मस्जिदसमोर, गोंवडी, मुंबई – ४०००४३ मो.क्र. ८०७०५५८८८०.

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर मी माझे जन्मापासून रहावयास असून माझे सोबत माझी पत्नी सना खान, वय २९ वर्षे, व मुलगा इमाद खान, वय ३ वर्षे यांचे सह राहतो. मी पत्रकारितेचे काम करीत असून मी राहत असलेल्या परिसरातील नागरीकांचे तक्रारी व अडचणीबाबत माहिती मी माझे 'प्रहारी मुंबई' नावाच्या न्युज पेपरमध्ये छापीत असतो. सदर न्युज पेपरचा संपादक मी स्वत: आहे. त्याचे ऑफिस प्लॉट नं. २८/एल/४, रोड नं.३, शिवाजीनगर, गोंवडी, मुंबई येथे आहे. त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितो.

माझे परिसरात राहत असलेला माझा मित्र नामे अनीस चांद सय्यद हा परीसरातील लोकांचे घरदुरुस्तीचे/घरबांधणीचे काम त्यांचे वडीलांसह करीत असतो. त्याने प्लॉट नं. ९/एल/५, रोड नं. १, शिवाजीनगर, गोंवडी, मुंबई येथील घर बांधकामाचे काम घेतलेले होते. सदर बांधकामाकरीता बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून परवानगी घेतली नसल्याने एम/पूर्व विभाग, गोंवडी, मुंबई येथील सुनिल मालोदे, कनिष्ठ अभियंता व अमर तांबे, कामगार एम/पूर्व विभाग, गोंवडी, मुंबई यांनी माझे मित्रास नमूद घराचे अनधिकृत बांधकाम हे विना परवाना असल्यामुळे ते पाडण्याची धमकी दिली होती. त्याबाबत माझे मित्राने मला माझी महानगर पालिकेत ओळख असल्याने लोकसेवक मालोदे यांना भेटण्यास सांगितले होते. त्याबाबत मी त्यांना भेटलो असता, त्यावेळी एम/पूर्व विभाग, गोंवडी, मुंबई येथील सुनिल मालोदे, कनिष्ठ अभियंता यांने माझेकडे बांधकाम परवानगीविना करण्याकरीता व बांधकामावर निष्कासनाची कारवाई कागदोपत्री केल्याचे दाखवुन उर्वरित बांधकाम पुर्ण करून घेण्याकरिता मदत करतो असे सांगुन रक्कम रू. ७०,०००/– इतक्या लाचेची मागणी केलेली होती.

मला दोन्ही आरोपीत लोकसेवकास लाच दयावयाची इच्छा नसल्याने मी दि. १५/०३/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे तक्रार देण्यासाठी आलो. त्यावेळी पोनि उमेश कोरडे यांनी सुनिल मालोदे व अमर तांबे हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत माझा लेखी तक्रार अर्ज स्वहस्ताक्षरात लिहून घेतला व त्यावर माझी सही घेतली. त्यानंतर पोनि कोरडे यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करून त्यांची ओळख करून दिली. त्यावर पोनि कोरडे यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पोनि कोरडे यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पोनि कोरडे यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला.

त्यानंतर पो.नि. कोरडे यांनी मला पुढे करण्यात येणाऱ्या कारवाईबाबत थोडक्यात माहिती सांगुन सदरची कारवाई दि. १६/०३/२०२१ रोजी करण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्याप्रमाणे मी माझा मित्र अनीस यांचेसह दि. १६/०३/२०२१ रोजी १३:३० वाजता दरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पो.नि. कोरडे यांचे समक्ष हजर झालो. त्यानंतर पोनि कोरडे यांनी पंचांसमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर मी, माझा मित्र अनीस, पो.नि. कोरडे व पथकासह शताब्दी रूग्णालय, गोवंडी, मुंबई येथे आलो असता, पोनि कोरडे यांनी मला पडताळणी कारवाई करण्यापुर्वी घ्यावयाच्या दक्षतेबाबत माहिती समजावुन सांगितली. त्याप्रमाणे लोकसेवक सुनिल मालोदे व अमर तांबे कार्यरत असलेल्या एम/पुर्व विभाग, गोंवडी, मुंबई येथे पडताळणीकरीता मला डिजीटल रेकॉर्डर लावून पंचासह पाठविले असता, कार्यालयामधील सुनिल मालोदे,

Scanned with CamScanner

कनिष्ठ अभियंता व अमर तांबे, कामगार एम/पूर्व विभाग, मनपा, गोंवडी, मुंबई यांची भेट झाली. त्यांच्यात व माझ्यात माझे मित्रांचे बांधकामाविषयी चर्चा झाली. तसेच नमूद बांधकामाचे निष्कासन न करण्याबाबत बोलणे झाले. परंतु नमूद लोकसेवक सुनिल मालोदे व अमर तांबे यांनी मला चालू अनधिकृत बांधकामाबाबत कारणे दाखवा नोटीस त्याचदिवशी बांधकाम चालु असलेल्या साईटवर दिली होती. मला माझे मित्र करीत असलेल्या बांधकामाच्या परवानगीबाबतचे कागदपत्र सादर करण्यास सांगितले. त्यावेळी नमूद लोकसेवक यांनी मला सर्वांना नोटीस पाठविल्याचे सांगून माझा मित्र अनीस बांधकाम करीत असलेल्या घराचे कामाबाबत साहेबांना विचारून सांगतो असे सांगितले. त्यानंतर मी लोकसेवकाच्या कार्यालयाच्या बाहेर आलो व कोणासही संशय येणार नाही अशा रितीने थांबलेल्या शासकीय वाहनाजवळ परत आलो.

त्यानंतर पोनि कोरडे यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण ऐकुन लोकसेवक यांच्या पडताळणी दरम्यान लाचेची मागणी निष्पन्न न झाल्याने दिनांक १७/०३/२०२१ रोजी पुन्हा पडताळणी कारवाई करावयाची आहे असे सांगून पुढील कारवाई तात्पुरती स्थगित केली. त्यानंतर पोनि कोरडे यांनी मला दिनांक १७/०३/२०२१ रोजी सकाळी १०.०० वा. ला.प्र.वि कार्यालय, मुंबई येथे येण्यास सांगितले.

पोनि कोरडे यांनी सांगितल्याप्रमाणे मी व माझा मित्र अनीस दिनांक १७/०३/२०२१ रोजी ला.प्र.वि कार्यालयात सकाळी १०:३० वाजता हजर झालो. त्यावेळी पोनि कोरडे यांनी मला माझे तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने पुन्हा पडताळणी कारवाई करावयाची आहे असे सांगितले. त्यानंतर मी, माझा मित्र अनीस, पो.नि. कोरडे व पथकासह शताब्दी रूग्णालय, गोवंडी, मुंबई येथे आलो असता पोनि कोरडे यांनी मला पडताळणी कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर पडताळणीकरीता मला डिजीटल रेकॉर्डर लावून पंचासह एम/पुर्व विभाग, मनपा, गोवंडी, मुंबई येथे पाठविले असता, दोन्ही लोकसेवक कार्यालयात उपस्थित नव्हते. म्हणून मी माझे वरील मोबाईल क्रमांकावरून लोकसेवक तांबे यांचे मोबाईल क्रमांक ९७६९२५१९३५ यावर संपर्क करून त्यांना लोकसेवक सुनिल यांचे त्याच्या साहेबांशी बोलणे झाले का? याबाबत विचारणा केली असता, लोकसेवक तांबे यांनी त्याबाबत काही माहित नसल्याचे सांगून लोकसेवक सुनिल यांना फोन करून विचारणा करण्याबाबत सांगितले. त्यानंतर मी लोकसेवक सुनिल यांचे मोबाईल क्रमाक ९३२१८८४५८५ यावर संपर्क करून ' साहेबांशी बोलणे झाले का?' याबाबत विचारणा केली असता, लोकसेवक सुनिल यांनी मला त्यांचे कार्यालयात बोलावून 'नोटीस तो लेके जाओ फिर ओ' असे बोलून 'आ जा ना बात करेंगे आमने सामने' असे म्हणाले. त्यांनतर लोकसेवक सुनिल यांचे कार्यालयात जावून त्यांची भेट घेतली. त्यांच्यात व माझ्यात माझे मित्राचे बांधकामाविषयी चर्चा झाली. त्यावेळी कनिष्ठ अभियंता सुनिल मालोदे यांनी मला विना परवाना चालू बांधकाम पाडण्याचा अंतिम आदेशाची प्रत दिली. त्यावेळी कनिष्ठ अभियंता सुनिल मालोदे यांनी साहेबांशी बोलणे झाले असल्याचे सांगून त्यांचे मोबाईलमधील कॅलक्युलेटर वर ७० आकडा टाईप करून दाखविले व माझे मित्राचे बांधकामावर निष्कासन कारवाई न करण्याकरीता व विनापरवाना बांधकाम करण्याकरीता रू. ७०,०००/- इतक्या लाचेची मागणी केली. त्यावर मी त्यांना "सत्तर हजार...... बहुत जादा हो जायेगा यार " असे म्हणालो. त्यावेळी लोकसेवक मालोदे यांनी " आपसे जादा नही ले रहे है" असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांना लाचेची रक्कम कमी करण्याबाबत वांरवार विनंती केली असता, त्यांनी नकार दिला. त्यांनतर मी लोकसेवकाच्या कार्यालयातून निघून शासकीय वाहन थांबलेल्या ठिकाणी आलो.

Scanned with CamScanner

पोनि कोरडे यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण ऐकुन लोकसेवक सुनिल मालोदे यांची पडताळणी दरम्यान लाचेची मागणी निष्पन्न झाल्याने व लोकसेवकाने दिनांक १८/०३/२०२१ रोजी लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगितलेली असल्याने पुढील कारवाई तात्पुरती स्थगित केली. त्यानंतर पोनि कोरडे यांनी मला दिनांक १८/०३/२०२१ रोजी सकाळी १०:०० वा. ला.प्र.वि कार्यालय, मुंबई येथे येण्यास सांगितले

पोनि कोरडे यांनी सांगितल्याप्रमाणे मी दिनांक १८/०३/२०२१ रोजी ला.प्र.वि कार्यालयात सकाळी १०:४५ वाजता हजर झालो. त्यानंतर मी, पो.नि. कोरडे व पथकासह शताब्दी रूग्णालय, गोवंडी, मुंबई येथे आलो असता पोनि कोरडे यांनी मला माझा मित्र अनीस यांस तेथे बोलविण्यास सांगितले. त्यावर मी माझा मित्र अनीस यांस मोबाईल वर कॉल करून आम्ही थांबलेल्या ठिकाणी येण्यास सांगितले असता, काहीवेळाने माझा मित्र अनीस हा त्याची खाजगी मो.कार क्र .एमएच. ०३.बीसी. ७५७० कार घेवून शासकीय वाहनाजवळ आला. त्यावेळी पोनि कोरडे यांनी मला व माझा मित्र सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या व लोकसेवक सुनिल मालोदे यास त्याचे मोबाईलवर फोन करुन ते त्यांचे परिसरात असल्याची खात्री करुन भेटावयास जायचे ठरले. त्याप्रमाणे पो.नि. कोरडे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी माझे वरील मोबाईल क्रमांकावरुन लोकसेवक सुनिल मालोदे यांचे मोबाईल क्रमांक ९३२१८८४५८५ यावर प्रथम व्हॉटसअॅप कॉल व नंतर फोन कॉल केला असता, दोन्ही वेळेस त्यांनी कॉल उचलला नाही. त्यामुळे आम्ही सापळापुर्व कारवाई करून सापळा कारवाईकरीता पथकासह लोकसेवक सुनिल मालोदे यांची भेट घेण्याकरीता त्यांचे कार्यालयात जाण्याचे ठरविले. त्याप्रमाणे लोकसेवक सुनिल यांचे कार्यालयात मी व माझा मित्र अनीस यांचेसह गेलो असता, त्यावेळी लोकसेवक सुनिल मालोदे यांची भेट झाली. त्यावेळी लोकसेवक यांनी सांगितले की, ''साहब जो बोलेंगे वही होगा'' ''डेमोलेशन लेने का है'' त्यावर मी लोकसेवक सुनिल यांस साहेबांशी बोलणे झाले का याबाबत विचारले असता, लोकसेवक सुनिल यांने ''बोला मै साब को...साहब नही मान रहे है... '' असे म्हणाले. त्यावर मी ''साब की बात मान लिए.. ठिक है'' ''काम थोडा उपर जाने दो'' असे सांगितले असता, लोकसेवकाने ''मै साब से बोलुंगा मै'' असे म्हणाले व त्यानंतर '' ग्राऊड का तो डेमोलेशन करना पडेगा'' ''कॉलम बीलम भर लो, कच्चा कॉलम भर लो....साब को दिखेगा तो तुटेगा तो अच्छा दिखेगा.. ''असे बोलून लोकसेवक यांनी दाखविण्याकरीता थोडी निष्कासनाची कारवाई करावी लागेल असे सांगून लाचेची रक्कम सोमवारी घेवून येण्यास सांगितले. त्यामुळे मी लोकसेवकाच्या कार्यालयातून निघून शासकीय वाहन थांबलेल्या ठिकाणी आलो.

त्यानंतर पोनि कोरडे यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण ऐकुन लोकसेवक सुनिल मालोदे यांनी सापळा कारवाई दरम्यान लाचेची रक्कम स्विकारली नसल्याने तसेच नंमूद लोकसेवक सुनिल मालोदे यांनी मला सोमवार दिनांक २२/०३/२०२१ रोजी निष्कासन कारवाईच्यावेळी लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगितल्याने पुढील कारवाई तात्पुरती स्थगित करून सापळा काढून घेण्यात आला व दिनांक २२/०३/२०२१ रोजी पुन्हा सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगून मला दिनांक २२/०३/२०२१ रोजी मला माझे मित्रासह शताब्दी हॉस्पीटल, गोवंडी, मुंबई येथे परस्पर येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी व माझा मित्र अनीस यांचेसह तेथे सकाळी ११.०० वा पोहचलो थोडयाच वेळात पो.नि. कोरडे व पोलीस पथक दोन सरकारी वाहनांमधुन शताब्दी हॉस्पीटल, गोंवडी, मुंबई येथे आले. त्यानंतर पोनि कोरडे यांच्या सुचनेप्रमाणे सापळा पुर्व कारवाई करून लोकसेवक सुनिल मालोदे यास त्याचे मोबाईलवर फोन करुन ते त्याचे परीसरात असल्याची खात्री करुन भेटावयास जायचे ठरले. त्यानुसार मी माझे वरील मोबाईल क्रमांकावरुन सुनिल

Scanned with CamScanner

मालोदे यांचे मोबाईल क्रमांक ९३२१९८८४५८५ यावर फोन केला असता, त्यांनी तो उचलला व त्यांनी सांगितले की, ते दुसऱ्या ठिकाणी निष्कासन कारवाईकरीत असल्याचे सांगून दिनांक २३/०३/२०२१ रोजी माझे मित्राचे घराचे बांधकामावर निष्कासन कारवाई करण्याकरीता येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि कोरडे यांनी पुढील कारवाई तात्पुरती स्थगित केली. त्यानंतर पोनि कोरडे यांनी मला दिनांक २३/०३/२०२१ रोजी मला माझे मित्रासह शताब्दी हॉस्पीटल, गोवंडी, मुंबई येथे परस्पर येण्यास सांगितले.

त्याप्रमाणे मी व माझा मित्र अनीस यांचेसह तेथे सकाळी १०:४५ वा पोहचलो थोडयाच वेळात पो.नि. कोरडे व पोलीस पथक दोन सरकारी वाहनांमधुन शताब्दी हॉस्पीटल, गोंवडी, मुंबई येथे आले व त्यांनतर पोनि कोरडे यांनी मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर लोकसेवक सुनिल मालोदे यांनी माझ्याकडे मागणी केलेली लाचेची रक्कम रु. ७०,०००/– माझ्याकडे नसल्याने, मी माझ्याकडील स्वत:चे बचतीतील रु. २०,०००/– ( रु. ५००/– दराच्या भारतीय चलनाच्या ४० नोटा एकुण रु. २०,०००/– ) पो.नि. कोरडे यांचेकडे दिल्या. पो.नि. कोरडे यांनी त्यांचेकडे रू.५००/– दराच्या खेळण्यातील १०० नोटा रु.५०,०००/– असल्याचे सांगुन ते लाचेकरीता वापरण्यात येणार असल्याचे सांगितले. पो.नि. कोरडे यांनी कनिष्ठ अभियंता सुनिल मालोदे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला माझा डावा हात डोक्यावरुन वारंवार फिरवून पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे आजुबाजुस थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर पोनि कोरडे यांनी मला सापळा कारवाई करण्यापुर्वी करावयाच्या माहिती समजावुन सांगितली व लोकसेवक सुनिल मालोदे यास त्याचे मोबाईलवर फोन करुन ते त्याचे परीसरात असल्याची खात्री करुन भेटावयास जायचे ठरले. त्याप्रमाणे पो.नि. कोरडे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी माझे वरील मोबाईल क्रमांकावरुन सुनिल मालोदे यांचे मोबाईल क्रमांक ९३२१९८८४५८५ यावर फोन केला असता, त्यांनी तो उचलला व माझे फोनचा स्पिकर ऑन केला. सदरचा कॉल पो.नि. कोरडे यांनी त्यांचेकडील डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये रेकॉर्ड केला. त्यावेळी झालेल्या संभाषणा दरम्यान मी सुनिल मालोदे यांना 'किधर हो साहब' असे विचारले असता, त्यांनी सांगितले की, ते पोलीस स्टेशनमध्ये निष्कासन बंदोबस्त मागणी करीता आले असल्याचे सांगून माझे मित्राच्या बांधकामाच्या ठिकाणी निष्कासन कारवाई करण्याकरीता येत असल्याचे सांगितले. त्यावेळी मी लोकसेवक मालोदे यांस 'उधर आने के बाद फोन करो ' असे सांगितले. त्यांनतर मी त्यांचे फोनची वाट पाहत तेथेच शासकीय वाहनातच थांबून राहीलो.

त्यानंतर थोडया वेळात १२.५३ वाजता लोकसेवक अमर तांबे यांचे मोबाईल क्रमांक ९७६९२५१९३५ वरून मला माझ्या वरील मोबाईलवर फोन आला असता, तो मी उचलला व माझे फोनचा स्पिकर ऑन केला. सदरचा कॉल पो.नि. कोरडे यांनी त्यांचेकडील डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये रेकॉर्ड केला. त्यावेळी झालेल्या संभाषणा दरम्यान लोकसेवक तांबे यांनी मला माझे परिसरात निष्कासन कारवाईकरीता येत असल्याचे सांगून मला त्याठिकाणी येण्यास सांगितले.

त्यानंतर पो.नि. कोरडे यांचे सुचनेप्रमाणे सापळा पथकातील पोलीस अंमलदार वाहन चालक पो.ना.चा.क्र. ९८०८२६/श्री. शिवथरे यांनी पोलीस वाहनात पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अॅंथ्रासीन पावडर लावली व माझे जीन्स पॅन्टच्या उजव्या बाजुस असलेल्या खिशात अलगद ठेवली व ते पुढील सापळा कारवाईत सहभाग घेणार नसल्याचे सांगितले. त्यानंतर मी दोन पंच व सापळा पथकातील पो. अधिकारी व कर्मचारी असे अॅटो रिक्षाने

Scanned with CamScanner

माझे ऑफिस असलेल्या वरील नमुद ठिकाणी आलो. सदर ठिकाणी पोहचल्यानंतर पो.नि. कोरडे, मी व पंच क्र. १ चुलेट असे माझ्या ऑफिसमध्ये आलो. त्यानंतर सापळा कारवाईकरीता मला डिजीटल रेकॉर्डर लावून पंचासह माझे परिसरातील इतर निष्कासनाच्या ठिकाणी गेलो असता, त्याठिकाणी लोकसेवक सुनिल मालोदे यांची भेट झाली. त्यांनी हाताच्या इशाऱ्याने लोकसेवक अमर तांबे यांस भेटण्यास सांगितले असता, लोकसेवक तांबे माझेसोबत माझे न्युज पेपरच्या ऑफिसमध्ये आले. त्यावेळी स.पो.आ. संजय पाटील व पो.नि. कोरडे यांनी सापळा पथकातील कर्मचारी व पंच यांना माझे ऑफीसच्या आजुबाजुला कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने थांबून राहीले होते. त्यादरम्यान लोकसेवक तांबे यांनी माझेकडे हाताच्या इशाऱ्यांनी लाचेची रक्कम देण्यास खुणवले असता, माझ्याकडील रू.७०,०००/– रुपये लाचेची रक्कम ( रु. ५००/– दराच्या भारतीय चलनाच्या ४० नोटा एकुण रु. २०,०००/– व रू.५००/– दराच्या खेळण्यातील १०० नोटा रु.५०,०००/– असे एकुण रू. ७०,०००/–) असे लोकसेवक अमर तांबे यांना दिली व त्यास "सत्तर दिया हूँ... " त्यावर लोकसेवक तांबे यांने "हा" असे म्हणून ती त्यांनी त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन डाव्या हाताने त्यांनी परीधान केलेल्या पॅन्टचे डाव्या मागील खिशात ठेवली. व तेथुन निघुन गेले. त्यांनतर मी देखील त्यांचे पाठोपाठ माझे ऑफिसचे बाहेर रस्त्यावर येवून लोकसेवक अमर तांबे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत डावा हात डोक्यावरून वारंवार फिरवून सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. त्यावेळी पोलीसांनी तात्काळ लोकसेवक अमर तांबे यास लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडुन ताब्यात घेतले. तसेच निष्कासनाच्या कारवाईच्या ठिकाणावरून पुढे चालत जात असलेल्या लोकसेवक सुनिल मालोदे यास देखील पोलीसांनी ताब्यात घेतले.

लोकसेवक सुनिल मालोदे यांनी माझेकडे माझे मित्र अनीस याने घेतलेले बांधकाम परवानगीविना करण्याकरीता व बांधकामावर निष्कासनाची कारवाई केल्याचा दिखावा करून उर्वरित बांधकाम पुर्ण करून घेण्याकरिता मदत करतो असे सांगुन रक्कम रु. ७०,०००/– इतकी स्वत:करिता व तांबे यांच्याकरिता लाचेची मागणी करुन व नमुद लाचेची रक्कम लोकसेवक अमर तांबे याचेमार्फतीने स्विकारली म्हणुन माझी लोकसेवकांविरूध्द कायदेशीर तक्रार आहे

माझे, लोकसेवक सुनिल मालोदे व लोकसेवक अमर तांबे यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मला वाचुन दाखवुन हिंदीत समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( उमेश कोरडे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with CamScanner